# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)

जा.क्र./महा.वि./गो.वि./ ९९ /२०१९ | दिनांक :०९/१२/२०१९

स्मरणपत्र–२

## :: परिपत्रक ::

**विषय**:–विद्याविषयक लेखापरिक्षण पद्धतीने महाविद्यालयांचे संलग्निकरण चालू ठेवण्याबाबत

**संदर्भ**:–१. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १८८७/२०१९ दि. १४/१०/२०१९

२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ७१/२०१९ दि. ३०/११/२०१९

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विद्याविषयक लेखापरिक्षण पद्धतीने महाविद्यालयांचे संलग्निकरण चालू ठेवण्याबाबत विद्यापीठाच्या (www.unigug.ac.in) या संकेतस्थळावरील ऑनलाईन पध्दतीने लेखापरिक्षण पद्धतीचा अर्ज व विद्याविषयक लेखापरिक्षाणाकरिता अद्ययावत माहीती भरण्यासाठी संदर्भिय परिपत्रकान्वये वेळापत्रक निर्गमित करण्यात आलेले होते. परंतु बऱ्याच महाविद्यालयाची माहीती अप्राप्त असल्यामुळे खालीलप्रमाणे पुन:श्च वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. करिता सर्व संलग्नित महाविद्यालयांनी खाली नमुद दिलेल्या विहीत मुदतीत माहिती भरून २ प्रतित प्रस्ताव सादर करावे.

| अ.क्र. | कार्यक्रमाचे विवरण | अंतिम दिनांक पासून /पर्यंत |
|---|---|---|
| १ | विद्याविषयक लेखापरिक्षण पद्धतीचे शुल्क व निरंतर शुल्क जमा केल्यानंतर login ID & Password टाकून विद्याविषयक लेखापरिक्षण पद्धतीचा online अर्ज करणे | दि. ०९/१२/२०१९ ते दि. २१/१२/२०१९ |
| २ | अर्ज विद्यापीठाने मान्य (online Approval) केल्यानंतर विद्याविषयक लेखापरिक्षाणाकरिता माहीती online सादर करणे. | |
| ३ | विद्याविषयक लेखापरिक्षण पद्धतीचा अर्ज व विद्याविषयक लेखापरिक्षाणाकरिता माहीती, निरंतर संलग्निकरण शुल्क पावती व विद्याविषयक लेखापरिक्षण पद्धतीचे शुल्क पावती सहीत महाविद्यालयीन विभागात ( Hard Copy) मध्ये २ प्रतित सादर करावे. | |

उपरोक्त प्रमाणे विहीत वेळापत्रकानुसार कार्यवाही घेण्यात येत आहे. पुढील प्रशासकिय गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने प्रस्ताव विहीत मुदतीच्या आतच सादर करावे. तथापी दि. **२१/१२/२०१९ या** तारखेनंतर प्राप्त प्रस्तावावर विचार करण्यात येणार नाही. तसेच शै. सत्र २०२०–२१ करीता संलग्निकरण प्राप्त न झाल्यास याकरिता सर्वस्वी महाविद्यालयाचे अध्यक्ष/सचिव व प्राचार्य जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी.

मा. प्र–कुलगुरूंच्या आदेशान्वये,

डॉ. व्ही. सी. सोलारे
उपकुलसचिव (प्रभारी)म.वि
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतलिपी:–१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
२. मा. वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
३. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.